# दर्शना लुनावत यांची भारतीय जैन संघटना महिला जिल्हाध्यक्षपदी निवड

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

प्रवीण सुवालालजी पारख, राज्य सचिव, भारतीय जैन संघटना यांनी सौ.दर्शना निलेश जी लुनावत यांची सन २०२५ -२६ या दोन वर्षाकरिता भारतीय जैन संघटना छत्रपती संभाजीनगर, महिला जिल्हाध्यक्ष पदावर नियुक्ती केली.



सौ दर्शना निलेशजी लुनावत या अनेक सामाजिक संस्थावर कार्यरत असून त्यांनी अनेक धार्मिक सामाजिक संस्थावर कार्य केले आहे. समाजासाठी दिलेल्या योगदानाची त्यांना या निमित्ताने पावती मिळाली आहे. त्यांचे या निवडीबद्दल समाजाच्या विविध थरातून अभिनंदन केले जात आहे, राजेंद्र बाबू दर्डा, पंकज फुलपगार, झुंबरलाल पगारिया, मिठालाल कांकरिया, इंदरचंद संचेती, गौतम भाऊ संचेती, प्रवीण पारख, पारस चोरडिया, किशोर ललवाणी, राजेंद्र पगारिया, संतोष चोरडिया, अनिल भैय्या चोरडिया,सुभाष लूनावत, चंद्रकांत चोरडिया यांनी अभिनंदन केले आहे.

# श्री श्री १००८ गोविंद चैतन्य महाराजांच्या मार्गदर्शनाखाली पळसवाडीत महाभक्ति सोहळा



**खुलताबाद**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्या तील पळसवाडी श्रद्धा आश्रम येथे आयोजित विशेष प्रवचन व श्रीमद्भागवत कथा श्री श्री १००८ गोविंद चैतन्य महाराज श्रद्धा आश्रम टुणकी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. उड्डाणपूल ते होळी मैदान टाळ मृदुंगाच्या गजरामध्ये वैभवी दीदी (वृंदावन) यांच्या उपस्थितीत भव्य मिरवणूक झाली असून त्यानंतर सकाळी ८ ते ९ या वेळेत होळी मैदान, पळसवाडी येथे प्रवचनाच झाले. पंचक्रो शीतील भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते,तसेच ५ मे २०२५ पासून ११ मे २०२५ पर्यंत संगीतमय श्रीमद्भागवत कथा कार्यक्रम संपन्न होत आहे. या कथेमध्ये विविध मान्यवर संत व प्रवचनकार सहभागी झाले असून, सकाळी १० ते दुपारी ३ पर्यंत वैभवी श्री जी दीदी यांचे सुमधुर वाणीतील प्रवचन भाविकांना ऐकायला मिळत आहे. त्यानंतर ३ ते ३:३० यावेळेत गोविंद चैतन्य महाराज यांचे प्रवचन होत आहे.

संध्याकाळी दररोज ७:३० ते ८:३० क्रम ानुसार सात दिवस हभप शेषराव खंडागळे, हभप. कृष्ण पवार, अनिल महाराज वने, हभप आप्पा शास्त्री महाराज, हभप बाळू म हाराज दारकुंडे, स्वामी सच्चिदानंद महाराज, विद्या वामदेव तीर्थ स्वामी टाका आश्रम वेरूळ यांचे प्रवचन होत असून.१२ एप्रिल २०२५ रोजी १००८ गोविंद चैतन्य महाराज यांचे काल्याचे किर्तन व त्यानंतर भव्य दिव्य महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे. तरी भाविक भक्तांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून अध्यात्मिक लाभ घ्यावा, असे श्रद्धा आश्रम पळसवाडी आखातवाडा भक्त मंडळ व आयोजकांनी आवाहन केले आहे.

# स्मशानभुमी समस्या निवारणासाठी ग्रामपंचायतींनी सहकार्य करावे- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिल्ह्यात स्मशानभुमी समस्या निवारणासाठी मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत स्थानिक ग्रामपंचायत, सरपंच आदींनी प्रशासनाला सहकार्य करावे,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेतून स्मशानभुमी समस्या निवारण अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा सध्या चवथा टप्पा सुरु असून त्यात स्मशानभुमीच्या समस्यांची गावनिहाय माहिती संकलित केली जात आहे. आपल्या गावातील स्मशानभुमी असल्यास समस्यांची यादी, नसल्यास स्मशानभुमीच्या जागेबाबतचा प्रस्ताव, सुविधा नसल्यास त्याबाबत माहिती तहसिल कार्यालयात कळवावी,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.

# राज्यव्यापी मन हेलावणारा अभिनव लढा

# प्रियंकाताई चौधरी व डॉ. राजेंद्र दाते पाटील यांचा न्याय मिळेपर्यंत पायात चप्पल न घालण्याचा निर्धार !

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मस्सा जोगचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांना न्याय मिळेपर्यंत पायात चप्पल न घालण्याचा निर्धार त्यांच्या भगिनी प्रियंकाताई प्रताप चौधरी यांनी केला आहे. सरकार आम्हाला न्याय केव्हा मिळवून देईल हे माहिती नाही. त्यामुळे मी आत्ता विठ्ठलास व पांडुरंगालाच न्याय देण्याचे साकडे घातले आहे, असे त्या म्हणाल्या.

तर दुसरीकडे गेली साडेतीन दशके मराठा आरक्षणाचा आयोगाकडे तसेच उच्च व सर्वोच्च न्यायालयात कायदेशीर लढा देणारे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी दस्तुर खुद्द संविधानालाच साकडे घातले असून मराठा आरक्षण मिळून न्याय मिळेपर्यंत पायात चप्पल बूट न घालण्याचा निर्धार त्यांनी अनेक वर्षा पासुन केला असुन अनवाणी पायाने त्यांचा कायदेशीर लढा हळु हळु पुढे सरकत असुन आरक्षणाची मर्यादा वाढविणारी घटना दुरुस्त केल्या शिवाय मराठा सम ाजाला आरक्षण मिळणार नाही हेच त्यांचे कायदेशीर व घटनात्मक मागणे सत्य ठरले असुन जात निहाय जनगणना केल्यावर ओबीसी आरक्षणाची टक्के वारी वाढणार असुन इंद्रा सहानी प्रकरणातील ५०% मर्यादा सतत आडवी येईल हे त्यांचे म्हणणे सत्य ठरले असुन घटना दुरूस्ती झाल्या शिवाय न्याय मिळणार नसल्याचे त्यांचे मत तंतोतंत खरे ठरले असुन आपल्या मागण्यासाठी प्रियंकाताई प्रताप चौधरी आणि डॉ राजेंद्र दाते पाटील हे दोघे मन हेलावणारे अतुलनीय कार्य करत असुन याची धग आता समाजाला दाद मागत असुन या त्यागाचे फळ नक्कीच मिळेल याची खात्री सर्व दुर पसरली आहे.

असे आगळे वेगळे व समाज मनाला हेलावून सोडणारी ही आंदोलनाची दिशा सगळ्यांनाच हळु हळु विचार करायला भाग पाडत असुन महाराष्ट्रभर या अभिनव आणि जीवाची कासावीस करणाऱ्या या पडद्या आड असलेल्या आंदोलनाकडे अत्यंत गांभीर्याने पाहीले जात असुन ध्येय वेडी माणसेच असे अभिनव त्यागाचे आंदोलन उन्हाचे खडक चटके झेलत करत आहे हे विशेष होय. प्रियंकाताई प्रताप चौधरी आणि डॉ राजेंद्र दाते पाटील यांचे या त्यागी वृत्तीच्या आंदोलनास आमचा जाहीर पाठिंबा असल्याचे अखंड भारत मराठा साम्राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रामचंद्र शेडगे मुंबई सातारा, संतोष दळवी मावळ, भरत दळवी,विठ्ठलराव दळवी पाटील,भाऊसाहेब तुपे, रामभाऊ नढे,शिवाजी निंबळे, विशाल ढोले, सूर्यकांत दळवी, संजय दळवी, बाळू मसुरकर, शंकर दळवी,भीमराव दळवी शंकर नढे, मारुती दळवी,शंकर निंबळे, बाबू निंबळे, सुभाष देसाई कोल्हापूर, कृष्णत नलावडे माण, दत्ता शेळके व्यासदेव पवार, प्रकाशभाऊ जगताप फलटण, श्रीपाद सपकाळ सातारा, शिवाजी उगले जालना, नाना भिंताडे, पोपट भिलारे, संदीप ऐजरे, कृष्णाजी नलवडे, संतोष चव्हाण पुणे, कैलासराव पाटील मुंबई, आनंदराव भोसले कोल्हापूर, अंकुश मुळीक पाटण, मधुकर कोडक मुंबई,अशोक शिंदे पारनेर, जितेंद्रभाई रांजने मुंबई भोर,जालिंदर वंडेकर मुंबई, राजेश देशमुख नाशिक, योगेश बहादुरे, डॉ रावसाहेब लहाने छत्रपती संभाजीनगर, डॉ परमेश्वर माने,उमेश अंडील, किशोर ढमाले बीड,चंद्रकांत शेळके,अनिल संकपाळ जगन्नाथ उदुगडे, वैभव बागल सांगली, सौं.कविता शिंदे, अर्जुन पिसाळ खटाव,संभाजी जाधव नांदेड,प्रदीप कोरडे पुणे, प्रकाश तरटे आटपाडी, संतोष मोहिते कडेगाव, राज रास्ते, अक्षय घाडगे सांगली, प्रथमेश पवार सातारा, हेमचंद्र नलवडे पुणे,दीपक वीर सातारा, नवनाथ फडतरे खटाव,दत्ता फडतरे कोरेगाव,अनिल उंब्रटकर मुंबई,गौरव पवार सातारा नवी मुंबई,चंद्रकांत खोत मुंबई कोल्हापूर अशा अनेक राज्य भरातील मान्यवरांनी पाठींबा जाहीर केला आहे.



**"स्व.संतोष देशमुखांना न्याय मिळेपर्यंत चप्पल घालणार नाही: बहिणीचा निर्धार**



**"तर आरक्षण मिळे पर्यंत चप्पल घालणार नाही भावाचा निर्धार; अगदी संविधाना लाच साकडे**

# पशुसंवर्धन विभागाच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पशुसंवर्धन विभागाच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. हे अर्ज ऑनलाईन पद्धतीने करण्याची सुविधा उपलब्ध आहे. एखाद्या योजनेसाठी अर्ज केल्यानंतर दरवर्षी पुन्हा अर्ज करावे लागू नये, यासाठी पाच वर्षे प्रतिक्षा यादी ठेवण्याची सोय केली आहे. सन २०२५-२६ या वर्षात पशुपालकांना डेअरी, पोल्ट्री, शेळीपालक असे पर्याय निवडण्याची सोय देण्यात आली आहे. इच्छुक लाभार्थ्यांनी htts://ah.mhabms.com वर अर्ज करावा. तसेच अक-चअकअइचड या मोबाईल ॲपवर सुद्धा अर्ज करता येणार आहे. हे ॲप गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे. ऑनलाईन अर्ज दि.१ जून २०२५ पर्यंत करता येणार आहेत. अधिक माहिती वा तांत्रिक अडचणींसाठी १९६२ याता टोल फ्री क्रमांकावर सोमवार ते शनिवार सकाळी ७ ते सायं.६ यावेळात संपर्क साधावा अथवा नजिकच्या पशुवैद्यकीय दवाखाना, पशुसंवर्धन विभाग पंचायत समिती, जिल्हा परिषद, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

ऑनलाईन अर्ज मागविणे व लाभार्थी निवड प्रक्रियेचे वेळापत्रकही विभागाने जाहीर केले आहे. दि.२ जून पर्यंत ऑनलाईन अर्ज स्विकारणे, दि.३ ते ७ जून- रॅन्डमायझेशन पद्धतीने लाभार्थ्यांची प्राथमिक निवड, दि.८ ते १५ जून मागील वर्षी तसेच या वर्षीच्या लाभार्थ्यांमार्फत कागदपत्रे अपलोड करणे, दि.१६ ते २४ जून पशुधन विकास अधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्यामार्फत कागदपत्रे पडताळणी करुन निवड पूर्ण करणे, दि.२५ ते २७ जून लाभार्थ्यांमार्फत कागदपत्रातील त्रुटी दूर करणे, दि.२८ -३० जून कागदपत्रे अंतिम पडताळणी, दि.१ जुलै राखीव व दि.२ जुलै रोजी अंतिम लाभार्थी पात्रता यादी तयार करणे असा कालबद्ध कार्यक्रम जाहीर केला असून लाभार्थ्यांनी अर्ज करावे,असे आवाहन पशुसंवर्धन विभागाने केले आहे.

# महाराष्ट्र नवनिर्माण सेना छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील सर्व जागा ताकदीने लढणार

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महानगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत्या चार म हिन्यात घेण्यात यावा असा महत्त्वपूर्ण निकाल आज सर्वोच्च न्यायालयाने दिला. महाराष्ट्र नवनिर्माण सेना या निर्णयाचे स्वागत करत असून छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या निवडणुकीतील सर्व जागा मनसे लढवणार आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे छत्रपती संभाजीनगर शहरात कार्यकर्त्यांचे जाळे असून प्रत्येक विभागात मनसेच्या शाखा काम करतात,शहरातील नागरिकांच्या अनेक प्रश्नांवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने सतत आवाज उचलला आहे.

पाणी,रस्ते,वीज आधी प्रश्नांवर इतर पक्षांपेक्षा मनसेने अधिक आंदोलन करून जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.

कोरोना काळात देखील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कार्यकर्ते रस्त्यावर काम करताना जनतेने पाहिले आहे, या सर्व गोष्टींचा विचार करता महाराष्ट्र नवनिर्माण सेना मनपा निवडणूक ताकदीने लढवणार असून निश्चितच यामध्ये मोठा विजय म नसेला मिळेल.

# ज्ञान संदिप शिक्षण संस्था औरंगाबाद संचलित ज्ञान संदीप प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात शाहू महाराज स्मृतिदिनी अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

दिनांक ६ मे २०२५ रोजी ज्ञान संदीप प्राथमिक विद्यालय व माध्यमिक विद्यालय मिसरवाडी येथे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रकाश सोनवणे सचिव संगीताताई खिल्लारे मुख्याध्यापक अभिजीत सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली शाहू महाराज यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला व त्यांच्या फोटोस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माध्यमिक विभागाचे पदवीधर शिक्षक किरणकुमार सोनवणे यांनी केले .तर आभार प्रदर्शन अजयकुमार खिल्लारे यांनी मानले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आनंद सातदिवे, श्रीमती वैशाली बोर्डे, बी.बी.शिंदे, नय्युम शेख, स्वामी जाधव, गौतम मकासरे यांनी परिश्रम घेतले यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रकाश सोनवणे यांनी शाहू महाराज यांच्या कार्याला उजाळा दिला व भावपूर्ण आदरांजली अर्पण केली.



# राजकीय व्यंगचित्राचा प्रकार असते लोकशाहीचे प्रतीक...

**पुणे (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आपल्या चेहऱ्यावर हास्याची लकेर उमटवणाऱ्या प्रत्येक व्यंगचित्रांची शाखा वेगळी असते. राजकीय व्यंगचित्र लोकशाहीचे प्रतीक असते, तर अभ्यासक्रमाशी संबंधित व्यंगचित्र शिक्षकाची भूमिका बजावणारे असते. या व्यंगचित्रांमुळे जीवनातील क्लिष्टता कमी होते,असे मत ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि. द. फडणीस यांनी व्यक्त केले.

विश्वास प्रकाशनातर्फे जागतिक व्यंगचित्रकार दिनाच्या पूर्वसंध्येनिमित्त व्यंगचित्रांचे ज्येष्ठ अभ्यासक, संग्राहक आणि प्रसिद्ध लेखक मधुकर धम र्पुरीकर लिखित 'हास्य चित्रे देशातली परदेशातली' या पुस्तकाचे प्रकाशन सोमवारी ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि. द. फडणीस आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. वसंत काळपांडे यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

स्वा. सावरकर अध्यासन केंद्रात झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर डॉ.काळपांडे, लेखक मधुकर धर्मापुरीकर, प्रसिद्ध चित्रकार गिरीश सहस्रबुद्धे आणि विश्वास प्रकाशनाच्या संचालक वैशाली पेंडसे-कार्लेकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मधुकर धर्मापुरीकर यांच्या खास शैलीत देशातल्या आणि परदेशातल्या हास्यचित्रांचा आस्वाद रसिकांनी घेतला. यावेळी बोलताना व्यंगचित्रकार शि. द. फडणीस म्हणाले की, बालभारतीच्या निमित्ताने गणितासारख्या क्लिष्ट विषयात व्यंगचित्रांचा समावेश करण्याचा प्रस्ताव आला, तेव्हा त्याला विरोध देखील झाला. मात्र, आमच्या आणि व्यंगचित्र कलेच्या बाजूने उभ्या राहिलेल्या सुजाण व्यक्तींमुळे ती संकल्पना प्रत्यक्षात आली. व्यंगचित्र हे केवळ हास्य निर्माण करत नाही, तर चित्र पाहणाऱ्याला ज्ञानचक्षू प्रदान करीत असते. नव्या पिढीतील मुलांपर्यंत पुस्तकाच्या माध्यमातून व्यंगचित्रे पोहोचविण्याचा विश्वास प्रकाशनाचा प्रयत्न अतिशय स्तुत्य आहे. व्यंगचित्रांचा अभ्यास करण्यासाठी झपाटून जाऊन काम करणारे मधुकर धर्मापुरीकर हे चांगल्या अर्थाने एक उत्तम व्यसनी व्यक्ती आहेत. त्यांचे 'हास्य चित्रे देशातली परदेशातली' हे पुस्तक नक्कीच मार्गदर्शक ठरेल.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**